भु. नि. अर्ज क्र. १८९/२०१८
शामराव वि. महा. शासन

**नि.क्र.३३ वरील आदेश.**

गैरअर्जदार क्र. १ यांनी निशाणी ३३ वरील अर्ज अर्जामध्ये लेखी म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, गैरअर्जदार क्र. १ यांनी मुदतीत आपले म्हणणे दाखल केले नाही. तर अर्जदाराने गैरअर्जदार क्र. २ विरुध्द पुरेशी संधी देऊनही स्टेप्स न घेतल्यामुळे प्रकरण खारीज करण्यात आले होते. आजरोजी गैरअर्जदार क्र.२ विरुध्द खारीज झालेला आदेश रद्द करण्यात आलेला आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांनी सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदाराने सदर अर्जावर योग्य व न्याय आदेश पारीत करण्याबाबत म्हणणे सादर केले आहे.

४. अर्जाची व लेखी जबाबाची पाहणी केली. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणात गैरअर्जदार हे शासनाचे अधिकारी असल्यामुळे व प्रकरणात योग्य तो न्यायनिर्णय होण्यासाठी सदरचा विलंब माफ करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** गैरअर्जदार क्र.१ यांचा निशाणी ३३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.03.11 17:13:13 +0530

जालना (श्रीमती. ए. पी. दिवाण)
दि.१०.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, जालना
जालना.